राज्यातील नाविन्यपूर्ण संकल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी "सेवा संकल्प अभियानांतर्गत" महाराष्ट्र "सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज" अभियान राबविण्याकरिता प्रमाणित कार्यपध्दती (SOP) विहित करण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन
कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक: सेसंअ-२०२६/ई.ऑ.नं.१८५३६९०/प्रशा-४
हुतात्मा राजगुरु चौक, मुख्य इमारत, दुसरा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३ नोव्हेंबर, २०२६

संदर्भ :-१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक सेसंअ-२०२६/प्र.क्र.९५/रवका-२, दि. ०९ सप्टेंबर, २०२६.
२. कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग,शासन परिपत्रक क्रमांक: सेसंअ-२०२६/ई. क्र. १८५३६९०/प्रशा-४, दिनांक १८ सप्टेंबर, २०२६

प्रस्तावना :-

नागरिकांच्या प्रशासकीय समस्यांचे जलद गतीने निवारण करण्यासाठी आणि शासकीय सेवांमध्ये पारदर्शकता आणण्सासाठी शासनाच्या संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये राज्यात दिनांक १७ सप्टेंबर, २०२६ ते दिनांक १७ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत "सेवा संकल्प अभियान" राबविण्यात आले आहे.

२. उक्त शासन निर्णयास अनुसरुन संदर्भ क्र.२ येथील शासन परिपत्रकान्वये, या विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी (MSInS) मार्फत राज्यस्तरीय "इनोव्हेशन चॅलेंज महाराष्ट्र २०२६" हा उपक्रम संपूर्ण राज्यात राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. "सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज" अंतर्गत राबविण्यात आलेल्या उपक्रमामधून महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीकडे विविध क्षेत्रातील समस्या,विवरणे आणि समस्या निराकरण करण्यासाठी मोठया प्रमाणात समाधाने प्राप्त झाली आहेत. या उपक्रमात सहभागी झालेल्या उमेदवारांकडून प्राप्त झालेल्या समस्या विवरणे/समाधाने यांच्या अनुषंगाने त्यांना तज्ज्ञ परीक्षक मंडळासमोर सादरीकरणाची संधी देण्यात येणार असून यामधून निवड केलेल्या उत्कृष्ट समस्या-समाधान कल्पनांचा शासनामार्फत गौरव करण्यात येणार आहे. या उपक्रमाची पारदर्शक व प्रभावी पद्धतीने अंमलबजावणी व्हावी यासाठी प्रमाणित कार्यपध्दती (SOP) विहित करण्याच बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक :-

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी (MSInS) मार्फत राबविण्यात येणाऱ्या "सेवा संकल्प अभियान" अंतर्गत राज्यस्तरीय "सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज" या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीकरीता "प्रमाणित कार्यपद्धती" विहित करण्यास व त्यानुसार या उपक्रमाची अंमलबजावणी करण्यास या शासन परिपत्रकान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. "सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज" या उपक्रमाची "प्रमाणित कार्यपद्धती" या शासन परिपत्रकासोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट - अ नुसार राहील.

३. सोबत जोडण्यात आलेल्या प्रमाणित कार्यपध्दतीनुसार राज्यामध्ये "सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज" या उपक्रमाची यशस्वी व प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य

नाविन्यता सोसायटी, मुंबई यांची राहिल. त्यांनी या उपक्रमाशी संबंधित सर्व यंत्रणांसोबत समन्वय साधून विहित वेळेत कार्यवाही पुर्ण करावी.

४. या उपक्रमाच्या प्रभावी व यशस्वी अंमलबजावणीसाठी सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता जिल्हा कार्यालय हे "समन्वयक अधिकारी" म्हणून कार्यरत राहतील.

५. "सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज" या उपक्रमासाठी येणारा सर्व खर्च महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी यांचेकडे उपलब्ध असलेल्या निधीमधून शासनाच्या विहित केलेल्या अर्थसंकल्पिय नियमांस अनुसरुन भागविण्यात यावा.

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक क्र.२०२६११०३१२०३२६४००३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by VAISHALI MANISH SULE
Date: 2026.11.03 12:04:40 +05'30'

(वैशाली सुळे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. मा. उपमुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव,
३. मा. मंत्री, कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांचे खाजगी सचिव,
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
५. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग,
६. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
७. सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी,
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई,
९. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई,
१०. कुलगुरू, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, मुंबई,
११. संचालक, महाराष्ट्र राज्य कौशल्य , व्यवसाय व प्रशिक्षण मंडळ, मुंबई,
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी , मुंबई,
१३. सर्व संबंधित क्षेत्रीय अधिकारी.
१४. निवड नस्ती.

परिशिष्ट-अ
सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज २०२६
प्रमाणित कार्यपद्धती (SOP)

महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीकडे "सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज"साठी विद्यार्थी, संस्था, स्टार्टअप, शाळा आणि महाविद्यालये मिळून ४५,००० पेक्षा अधिक नवोपक्रमांची नोंदणी झाली आहे. त्यामधून जिल्हानिहाय विजेत्यांची निवड करण्यात यावी. यासाठी खालीलप्रमाणे जिल्हा निवड समिती गठीत करण्यात येत आहे.

१. जिल्हा निवड समिती :-

अ.क्र.	प्रतिनिधी	समितीतील पदनाम
१	जिल्हाधिकारी/नामनिर्देशित प्रतिनिधी	अध्यक्ष
२	सृजन ट्रस्ट किंवा विज्ञान भारती, यांचे नामनिर्देशित प्रतिनिधी -१	सदस्य
३	क्षेत्र तज्ज्ञ - उद्योग, औद्योगिक संस्था/बँकींग तज्ञ प्रतिनिधी (सहायक आयुक्त यांच्याद्वारे नियुक्त) - १	सदस्य
४	संबंधित शासकीय विभागाचा प्रतिनिधी -१	सदस्य
५	प्राचार्य, जिल्ह्यातील नामांकित शासकीय /अशासकीय शैक्षणिक संस्था (अभियांत्रिकी/पॉलिटेक्निक,/वैद्यकीय / इतर)	सदस्य
६	इन्क्युबेशन केंद्र /नवोपक्रम क्षेत्रातील नामवंत तज्ज्ञ-१	सदस्य
७	सहायक आयुक्त, कौशल्य विकास रोजगार आणि उद्योजकता जिल्हा कार्यालय/जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी/प्राचार्य, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था	सदस्य सचिव

* जिल्हाधिकाऱ्यांना आवश्कतेनुसार नामवंत तज्ञांना निवड समितीमध्ये निमंत्रित करण्याचे तसेच अधिक समित्या तयार करण्याचे अधिकार राहतील.

* मूल्यांकनावेळी किमान चार सदस्यांची उपस्थिती अनिवार्य राहिल.

२. क्षेत्रनिहाय वर्गीकरण :- या उपक्रमात सहभागी क्षेत्रांचे खालील चार गटामध्ये वर्गीकरण करण्यात येत आहे.

गट व क्षेत्र	क्षेत्राशी संबंधित विषय	शासकीय तज्ञ
गट-१ कृषी आणि शाश्वतता	१. शेती व पूरक व्यवसाय २. ऊर्जा आणि सौर ऊर्जा ३. हवामान बदल व पर्यावरण	१. जिल्हा कृषी अधिकारी २. सहायक संचालक, ऊर्जा विभाग, ३. सहायक संचालक, प्रतिनिधी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ४. संबंधित क्षेत्रातील शासकीय अधिकारी
गट-२ सामाजिक विकास व कल्याण	१. आरोग्य आणि वैद्यकीय सेवा २. शालेय व उच्च शिक्षण ३. रोजगार व कौशल्य विकास ४. महिला व बालविकास	१. जिल्हा आरोग्य अधिकारी २. शिक्षणाधिकारी ३. बाल विकास प्रकल्प अधिकारी ४. अर्जाच्या स्वरूपानुसार इतर संबंधित अधिकारी
गट-३ सुरक्षा आणि संरक्षण	१. कायदा व सुव्यवस्था, २. नागरिकांची सुरक्षा, ३. संरक्षण क्षेत्राशी संबंधित तंत्रज्ञान	१. पोलीस आयुक्त किंवा पोलीस अधीक्षक यांनी नियुक्त केलेले पोलीस अधिकारी २. संरक्षण विभागाचे अधिकारी ३. इतर संबंधित शासकीय अधिकारी
गट-४ पायाभूत सुविधा व आधुनिक तंत्रज्ञान	१. नगर विकास २. वाहतूक व मोबिलिटी ३. उदयोन्मुख तंत्रज्ञान ४. पायाभूत सुविधा, आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान	१. नगर रचनाकार २. सार्वजनिक बांधकाम विभाग अधिकारी ३. परिवहन अधिकारी ४. माहिती तंत्रज्ञान (IT) अधिकारी

उपरोक्त क्षेत्र वगळता आवश्यकतेनुसार विषयतज्ज्ञ आमंत्रित करण्याची मुभा सदस्य सचिव यांना राहिल.

३. समन्वयन, मुल्यमापन कालावधी :-

अ.क्र.	घटक / टप्पा	कार्यवाही व मुदत
१	सहभागी घटक	जिल्ह्यातील सर्व विद्यार्थी, संस्था, स्टार्टअप्स, शाळा आणि महाविद्यालये.
२	मुल्यमापन	संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखालील जिल्हा समिती अंतिम मूल्यमापन करेल.
३	जिल्हा समन्वयक	सहायक आयुक्त (कौशल्य विकास) हे या संपूर्ण प्रक्रियेचे "समन्वय अधिकारी" असतील.
४	अर्जांची विभागणी	सर्व अर्ज अर्जदाराच्या मूळ जिल्ह्यानुसार वेगळे करून त्या-त्या जिल्ह्यात पाठविण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीची असेल.
५	अर्जांची शॉर्टलिस्ट (AI Shortlisting)	ज्या जिल्ह्यात जास्त अर्ज येतील, तिथे वेळ वाचवण्यासाठी AI (कृत्रिम बुद्धिमत्ता) तंत्रज्ञानाचा वापर करून गुणवत्तेनुसार पहिली प्राथमिक यादी MSInS मार्फत केली जाईल.
६	ऑनलाइन सादरीकरण	४ आणि ५ नोव्हेंबर २०२६ रोजी उमेदवारांनी त्यांचे प्रकल्प ऑनलाइन सादर करावे.
७	परीक्षकांचे केंद्र	जिल्ह्यातील एकाच मुख्य केंद्रावर (Central Venue) सर्व परीक्षक एकत्रित ऑनलाइन सादरीकरण पाहतील.
८	पारदर्शक गुणदान व रेकॉर्डिंग	प्रत्येक सादरीकरणाचे व्हिडिओ चित्रीकरण (Recording) केले जाईल. प्रत्येक परीक्षकाला स्वतंत्र लॉगिन आयडी व पासवर्ड दिला जाईल, ज्यावरून ते ऑनलाइन गुण देतील.
९	तांत्रिक मदत	सादरीकरण किंवा ऑनलाइन सिस्टीममध्ये तांत्रिक समस्येचे निराकरण करण्यासाठी शासकीय ।T। मधील शिल्प निदेशक (Instructors) व गट निदेशक तसेच माहिती व तंत्रज्ञ तांत्रिक जबाबदारी सांभाळतील.
१०	अंतिम निकाल	संपूर्ण मूल्यमापन पूर्ण करून जिल्ह्यानिहाय अंतिम निकाल राज्यस्तरावर घोषित करण्यात येईल.

४. स्पर्धेचे वेळापत्रक आणि टप्पेनिहाय प्रक्रिया :-

टप्पा	अ.क्र.	करावयाची कार्यवाही
टप्पा - १: समितीची स्थापना (दि. ३१ ऑक्टोबर २०२६)	१	शासनातर्फे संबंधित जिल्ह्यांच्या सहायक आयुक्तांना पत्र पाठविण्यात येईल.
	२	सहायक आयुक्त (कौशल्य विकास) हे जिल्हा समिती आणि ४ मूल्यमापन मंडळे स्थापन करतील.
	३	सहायक आयुक्त प्रत्येक गटासाठी आवश्यक असलेल्या क्षेत्र तज्ज्ञांची अधिकृत नियुक्ती करतील.
	४	सृजन ट्रस्ट, विज्ञान भारती आणि संबंधित इन्क्युबेटर्स आपले प्रतिनिधी या समितीसाठी नियुक्त करतील.
टप्पा - २: अर्जांची यादी (दि. ३१ ऑक्टोबर २०२६)	५	३० ऑक्टोबरला अर्ज भरण्याची मुदत संपल्यावर, ३१ ऑक्टोबरपर्यंत MSInS अर्जांची यादी संबंधित जिल्ह्यांकडे सुपूर्द करेल.
टप्पा - ३: लघुयादी (Shortlist) (दि. २ नोव्हेंबर २०२६)	६	ज्या जिल्ह्यांमध्ये अर्जांची संख्या खूप जास्त आहे, तिथे मंजुरी मिळालेल्या प्राथमिक छाननी शीटनुसार AI तंत्रज्ञानाचा वापर करून अर्ज शॉर्टलिस्ट केले जातील.
टप्पा - ४: पूर्वतयारी (दि. ३ नोव्हेंबर २०२६)	७	प्रत्येक परीक्षकासाठी ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर स्वतंत्र लॉगिन आयडी तयार केला जाईल, ज्यामध्ये त्यांना फक्त त्यांच्याच गटातील अर्ज दिसतील.
	८	इंटरनेट, व्हिडिओ कॉल, स्क्रीन शेअरिंग आणि तांत्रिक अडचणी सोडवण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात ४ - IT तंत्रज्ञान नेमावेत.
	९	सहायक आयुक्त मूल्यमापनासाठी ITI, इन्क्युबेटर किंवा कोणतीही शैक्षणिक संस्था निश्चित करतील. या केंद्रावर मोठा हॉल (Auditorium), हाय-स्पीड इंटरनेट, पॉवर बॅकअप आणि प्रत्येक मंडळासाठी स्वतंत्र खोल्या असणे अनिवार्य आहे.
टप्पा - ५: ऑनलाइन सादरीकरण (दि. ४ व ५ नोव्हेंबर २०२६)	१०	सर्व परीक्षक निश्चित केलेल्या मुख्य केंद्रावर येतील. अर्जदार त्यांना दिलेल्या लिंकद्वारे ऑनलाइन अर्ज सादरीकरण करतील.
	११	प्रत्येक अर्जदाराला एकूण १० मिनिटे वेळ देण्यात यावा. (सादरीकरण - ५ मिनिटे + ५ मिनिटे प्रश्नोत्तरे आणि उत्पादनाच्या प्रात्यक्षिकाच्या डेमोसाठी
	१२	सादरीकरण सुरू होण्यापूर्वी IT तंज्ञत्रान यांनी स्क्रीनवर अर्जदाराची ओळख तपासून घ्यावी.
	१३	अर्जदाराला पूर्वकल्पना देऊन संपूर्ण सादरीकरणाचे व्हिडिओ चित्रीकरण करण्यात यावे.
	१४	जर एखाद्या अर्जदाराला तांत्रिक समस्येमुळे सादरीकरण करता आले नाही, तर वेळ उपलब्ध असल्यास त्याला त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी पुन्हा संधी द्यावी.
टप्पा - ६: जिल्हास्तरीय	१५	प्रत्येक अर्जाचे सरासरी गुण प्राप्त करुन घ्यावेत.जर एखाद्या अर्जासाठी परीक्षकांच्या गुणांमध्ये १५ पेक्षा जास्त गुणांचा फरक आढळल्यास, सर्व मंडळ

मूल्यांकन (दि. ७ नोव्हेंबर २०२६)		सदस्य एकत्र चर्चा करून गुणांचे समायोजन (Moderation) करतील.
	१६	दोन अर्जदारांना सारखेच गुण मिळाल्यास, ज्याला 'व्यवहार्यता आणि सज्जता' (Feasibility & Readiness) मध्ये जास्त गुण आहेत त्याला प्राधान्य दिले जाईल. तिथेही गुण समान असल्यास, 'प्रभाव आणि विस्तारक्षमता' (Impact & Scalability) मधील अधिक गुणांचा विचार केला जाईल.
	१७	मुल्यांकन केलेल्या **सर्व** प्रस्तावांचा अंतिम निकाल २ गटामध्ये गटनिहाय गुणानुक्रमानुसार **(Merit list as per scores)** सहायक आयुक्तांच्या स्वाक्षरीसह अपलोड करावा.

५. मुल्यमापन खालीलप्रमाणे २ गटामध्ये निकषांप्रमाणे करण्यात येईल.

प्रवर्ग १ - मूल्यमापन निकष (संकल्पना सिद्धता, कल्पना / संकल्पना)

निकष	काय तपासायचे	गुण
समस्येची समज	निवडलेल्या उप-विषयाच्या समस्येशी ही कल्पना थेट जोडलेली आहे का (केवळ वरवरचा संबंध नसावा)? अर्जदाराला जमिनीवरील प्रत्यक्ष समस्येची समज आहे का: त्यांच्या जिल्ह्यात याचा कोणावर परिणाम होतोय, ती किती गंभीर आहे आणि सध्याचे प्रयत्न कुठे तोकडे पडत आहेत?	१५
संकल्पना सिद्धता / प्रात्यक्षिक / प्रस्तावित उपाय	उपाययोजना स्पष्टपणे समजावून सांगितली आहे का आणि ती संबंधित वापरकर्त्यांसाठी व्यावहारिक आहे का? यामुळे नमूद केलेल्या समस्येचे खरोखर निवारण होते का?	२०
नाविन्यता / कल्पकता	शासकीय विभाग किंवा सध्या बाजारात उपलब्ध असलेल्या पर्यायांपेक्षा यात काय नवीन किंवा स्पष्टपणे सरस आहे? याचे नेमके फायदे काय आहेत (खर्च, वेग, पोहोच किंवा अचूकता)?	२०
व्यवहार्यता आणि तांत्रिक दृष्टिकोन	हे प्रत्यक्षात तयार करणे आणि प्रायोगिक तत्त्वावर (Pilot) राबवणे शक्य आहे का? पुढील टप्पे, अंदाजित खर्च आणि कालमर्यादा स्पष्ट आहे का? कोणता विभाग, स्थानिक संस्था किंवा वापरकर्ता याचा स्वीकार करेल?	२०
संभाव्य प्रभाव आणि व्याप्ती	याचा कोणाला आणि किती फायदा होईल? सार्वजनिक सेवेच्या दृष्टीने याचे मूल्य काय आहे? हे इतर जिल्ह्यांमध्ये लागू केले जाऊ शकते का?	१५
संघ / वैयक्तिक क्षमता	संबंधित संघ किंवा व्यक्तीकडे हे तयार करण्याचे कौशल्य आहे का, किंवा त्यांना मार्गदर्शक (Mentor) अथवा भागीदाराचे सहाय्य उपलब्ध आहे का? ते प्रश्नांची उत्तरे किती चांगल्या प्रकारे देतात?	१०
एकूण गुण		**१००**

प्रवर्ग २ - मूल्यमापन निकष :- (परीक्षित नमुना, प्रायोगिक तत्त्व पूर्ण, व्यावसायिकदृष्ट्या उपलब्ध / विस्तारित)

निकष	काय तपासायचे	गुण
समस्येची प्रासंगिकता	हा उपाय निवडलेल्या उप-विषयाच्या समस्येचे निवारण करतो का? जिल्हा किंवा राज्यासाठी समस्या किती महत्त्वाची आहे?	१५
उपाय आणि नाविन्यता	हे कसे कार्य करते आणि सध्याच्या उत्पादनांपेक्षा किंवा सरकारी प्रणालींपेक्षा ते कशा प्रकारे वेगळे आहे? यामध्ये अशी कोणती बौद्धिक संपदा (IP) किंवा तांत्रिक ज्ञान आहे ज्याची नक्कल करणे कठीण आहे?	१५
उत्पादन, तंत्रज्ञान आणि प्रमाणीकरण	हे एक प्रत्यक्ष कार्यरत उत्पादन आहे का? त्याची चाचणी, पायलट रन किंवा उपयोजन कुठे, किती काळासाठी आणि काय निकालांसह झाले आहे? याचे वापरकर्ते, प्रमाणपत्रे, पत्रे, आदेश (Orders) किंवा महसूल यांसारखे पुरावे उपलब्ध आहेत का?	२०
व्याप्ती आणि पुनरावृत्ती क्षमता	हे इतर जिल्ह्यांत किंवा राज्यांत लागू केले जाऊ शकते का? प्रति वापरकर्ता येणारा खर्च सरकारला परवडणारा आहे का? हे टिकवून ठेवण्यासाठी काही कार्यरत मॉडेल आहे का? हे सरकारी पायलट किंवा वर्क ऑर्डरसाठी तयार आहे का?	२०
व्याप्ती आणि पुनरावृत्ती क्षमता	हे इतर जिल्ह्यांत किंवा राज्यांत लागू केले जाऊ शकते का? प्रति वापरकर्ता येणारा खर्च सरकारला परवडणारा आहे का? हे टिकवून ठेवण्यासाठी काही कार्यरत मॉडेल आहे का? हे सरकारी पायलट किंवा वर्क ऑर्डरसाठी तयार आहे का?	२०

प्रभाव (सामाजिक, आर्थिक, पर्यावरणीय)	आतापर्यंत कोणता प्रभाव साध्य झाला आहे (पोहोचलेले वापरकर्ते, वाचलेला वेळ किंवा खर्च, सेवांचे परिणाम)? मोठ्या प्रमाणावर लागू केल्यास प्रभावाचा विश्वासार्ह अंदाज काय आहे?	१५
संघाची क्षमता	संघाकडे अंमलबजावणी करण्याची क्षमता आहे का: पूर्णवेळ सदस्य, संबंधित अनुभव आणि काम पूर्ण करण्याचा पूर्वअनुभव (Track Record)?	१५
एकुण		१००

सर्वसाधारण सूचना :-

१. सर्व निवड प्रक्रिया पूर्णपणे वस्तुनिष्ठ आणि गुणवत्तेवर आधारित असेल. गुणांची अचूक नोंद ऑडिट ट्रेलसह प्लॅटफॉर्मवर करण्यात येईल.

२. परीक्षक सदस्य त्यांचे कुटुंब, नोकरी, संस्था, गुंतवणूक किंवा मार्गदर्शन याद्वारे संबंधित असलेल्या कोणत्याही अर्जाचे मूल्यांकन करणार नाहीत. तसेच, सादरीकरण सत्राबाहेर अर्जदारांशी कोणताही वैयक्तिक संपर्क साधणार नाहीत.

३. सर्व जिल्हा अंतिम फेरीतील स्पर्धक, जिल्हा विजेते, यांना डिजिटल प्रमाणपत्रे दिली जातील.

४. समितीसमोर झालेल्या सादरीकरणामधून गुणवत्ता आधारीत (Merit Based) विजेत्यांची निवड करण्यात यावी.

५. तक्रार निवारणासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत यासाठी Helpline उपलब्ध करुन द्यावी.

****